



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २००, शनिवार २० एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विखेंचे कार्यकर्ते मारीत सुटले !

## लंके साहेबाचा प्रचार का करतो? विखे साहेबाचा कर! पाथर्डी तालुक्यात आणखी एकाला मारहाण

पाथर्डी : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीसाठी अर्ज दाखल करण्यापूर्वीच राजकीय वातावरण अतिशय तप्त झाले असून नीलेश लंके यांचा प्रचार करतो म्हणून खा. डॉ. सुजय विखे यांच्या कार्यकर्त्यांनी पाथर्डी तालुक्यात आणखी एकाला बेदम मारहाण केली. डॉ. विखे यांच्या अंगरक्षकाने लंके यांच्या जनसंवाद यात्रेत सहभागी झाला म्हणून लंके यांच्या समर्थकास बेदम मारहाण केल्याची घटना ताजी असतानाच पाथर्डी तालुक्यातच पुन्हा लंके समर्थकास मारहाण झाल्याने विखे यांच्या पायाखालची वाळू सरकू लागल्याच्या प्रतिक्रिया लंके समर्थकाकडून येत आहेत.**



या मारहाणीसंदर्भात सचिन नारायण हांडे रा. राघुहिवरे, ता. पाथर्डी यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. गुरूवार दि. १८ एप्रिल रोजी सकाळी बारा वाजण्याच्या सुमारास सचिन हांडे हे राघुहिवरे ग्रामपंचायत समोर उभे असताना जबर ज्ञानदेव कुऱ्हे, गोरख शंकर लबडे व दोन अनोळखी इसम हांडे यांच्याजवळ आले. शिविगाळ करत लंके साहेबाचा प्रचार का करतो अशी विचारणा करत तु विखे साहेबाचा प्रचार कर अशी त्यांनी गळ घातली. त्यावर सचिन हांडे यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. त्याचा राग येऊन गोरख शंकर लबडे याने हांडे यांच्या पोटावर व पाठीवर बेदम मारहाण केली. जबर ज्ञानदेव कुऱ्हे याने हांडे यांच्या उजव्या हाताच्या करंगळीवर ब्लेडने मारले. इतर दोघा अनोळखी इसमांनी हांडे यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. लाथा बुक्क्यांनी मारहाण मारहाण सुरू असताना हांडे हे जमीनीवर पडल्यानंतर ज्ञानदेव कुऱ्हे याने हांडे यांच्या खिशातील पॅन्टच्या उजव्या खिशातील ९ हजार रूपयांची रोकड काढून घेतली. मारहाणीनंतर सर्व आरोपी पसार झाले.

### अंगरक्षकापाठोपाठ कार्यकर्त्यांचीही दहशत

खा. डॉ. सुजय विखे यांचा अंगरक्षक गौरव सुधाकर गर्जे याने शहादेव पालवे यांना बेदम मारहाण केल्याची घटना ताजी आहे. शहादेव हे नीलेश लंके यांच्या स्वाभीमान जनसंवाद यात्रेत सहभागी झाल्याच्या रागातून गौरव गर्जे याने शहादेव यांना सहकाऱ्यांच्या मदतीने मारहाण केली होती. शहादेव यांना मारहाण झाल्यानंतर पोलीस फिर्यादही दाखल करूण घेण्यास तयार नव्हते. शहादेव यांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर फिर्याद दाखल झाली. नंतर पोलीसांकडून फिर्यादीची प्रत देण्यासही टाळाटाळ करण्यात आली. अखेर न्यायालयात दाद मागण्यात आल्यानंतर फिर्यादीची प्रत फिर्यादीस पोलीसांकडून देण्यात आली.

### नाहीतर छेडखानीचा गुन्हा दाखल करू

ज्ञानदेव कुऱ्हे व इतरांनी मारहाण केल्यानंतर जाताना तु पुन्हा लंके साहेबाचा प्रचार केला तर तुझ्यावर छेडखानीचा गुन्हा दाखल करू अशी धमकी अरोपींनी दिल्याचे हांडे यांच्या फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे.

### सत्तेचा माज

पाथर्डीमध्ये लंके समर्थकांना लागोपाठ दोनदा मारहाण झाली. एकीकडे राधाकृष्ण विखे, खा. डॉ. सुजय विखे हे मतदारसंघात गुंडा गर्दी माजल्याचा आरोप करतात, दुसरीकडे त्यांचेच कार्यकर्ते आमच्या सर्वसामान्य सहका-यांना बेदम मारहाण करून दहशत निर्माण करत आहेत. सत्ता तुमच्याकडे, याच सत्तेच्या जोरावर, तुमच्या पाठबळावर तुमचे कार्यकर्ते आमच्या सामान्य कार्यकर्त्यांवर दहशत निर्माण करत आहेत. मतदार मतपेटीतून त्याचे चोख उत्तर देतील.

**शिवशंकर राजळे**, तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट)

# आता ही पाकीटमारी बंद करायची का नाही ?

## शरद पवारांचा मोदींवर घणाघाती हल्ला



बारामती: प्रतिनिधी

**दहा वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, पेट्रोलचे भाव ५० दिवसांत खाली आणतो. ५० दिवसांत दर खाली आले नाहीत पण भाव दीडपट वाढले. यांनी पेट्रोल, डिझेल महाग केले आणि साखर, दूध स्वस्त केलं. तुम्ही जे पिकवता तेस्वस्तकेलं आणि दुसरे पिकवतात त्यासाठी तुमच्या खिशातून पैसे काढलेकाढले. सांगताना सांगतात की सगळ्यांच्या खिशात काही हजार रुपये टाकले. मात्र पैसे घालायचे एका खिशात आणि खालच्या खिशातून काढून घ्यायचे आणि तेही डबल काढून घ्यायचे, आता ही पाकीटमारी बंद करायची की नाही? आणि पाकीटमारी बंद करायची असेल तर हा पाकीटमार कोण? याचा शोध घ्यावा लागेल आणि त्यांना बाजूला करावे लागेल, असा घणाघाती हल्ला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर चढवला.**

बारामती तालुक्यातील कन्हेरी येथे आज सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. येथील मारुती मंदिरात ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते नारळ वाढविण्यात आला. यावेळी आमदार रोहित पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंबीय उपस्थित होते.

**‘‘बटन कसं दाबायचं ते मी सांगणार नाही‘‘**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका मेळाव्यात ईव्हीएम मशीनमध्ये कचाकचा बटन दाबा. आपल्या भागाला निधी कमी पडू देणार नाही, असे वक्तव्य केले होते. हाच धागा पकडत शरद पवार म्हणाले की, ‘‘आपल्याला वाद वाढवायचे नाहीत. संघर्ष वाढवायचा नाही. आपल्याला मनापासून काम करायचे आहे आणि हे काम करत असताना तुतारीचे बटन दाबा. काल कुणीतरी सांगितले की, बटन कसं दाबायचं. ते मी सांगणार नाही‘‘ पवारांच्या या क्तव्यानंतर एकच हशा पिकला.

**अजितदादांवर शरद पवारांचा हल्ला**


बटन असं दाबलं की तुम्हाला काही कमी पडणार नाही. या खोलात मी जाऊ इच्छित नाही मात्र... देणे घेणे करून मते मागण्याची आमची भूमिका नाही. इथे काम करायचे, लोकांना शक्ती द्यायची, लोकांची सेवा करायची आणि मते मागायची ही आमची भूमिका आहे, अशा शब्दांत शरद पवारांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वक्तव्याचा समाचार घेतला.

**जित्राब साधे नाही, बारामतीकरांचे आगळेवेगळे कौतुक**

यंदाच्या बारामती लोकसभा निवडणुकीकडे महाराष्ट्रासहित देशाचे लक्ष लागले आहे. म्हणूनच वेगवेगळ्या राज्यांसह अमेरिकेतील पत्रकार मोठ्या उत्सुकतेने बारामतीत दाखल झाले आहेत. सर्वांना उत्सुकता आहे की बारामतीकर काय करतात. त्यांना माहिती आहे की, हे काय जित्राब (गंमतीने) साधे नाही. जिथे शिकवायचा आहे तिथे धडा शिकवतात. जिथे ठोस काम करायचे आहे तिथे ठोस काम करतात, असे म्हणत त्यांनी बारामतीकरांचेही कौतुकही केले.

# रामाच्या मंदिरात सीतेची मूर्ती का नाही?

## शरद पवारांचा सवाल



पुणे : प्रतिनिधी

**अयोध्येत २२ जानेवारी २०२४ या दिवशी राम मंदिरात राम मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, सरसंघचालक मोहन भागवत आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ या तिघांच्या उपस्थितीत तसंच साधू-संतांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. नुकतीच अयोध्येतल्या मंदिरात रामनवमी साजरी झाली आणि सूर्यतिलक सोहळाही पार पडला. आता रामाच्या मंदिरात सीतेची मूर्ती का नाही असा प्रश्न शरद पवारांनी विचारला आहे.**

**काय म्हणाले शरद पवार?**

‘‘एका मिटिंगमध्ये माझ्यापुढे विषय निघाला त्यात महिलांनी अशी तक्रार केली की रामाचं सगळं बोलत आहात मग सीतेची मूर्ती का बसवत नाही? मी महाराष्ट्रात फिरतो आहे. मला अनुकूल चित्र दिसतं आहे. राम मंदिर होऊन गेलं आता त्याविषयी लोकांमध्ये चर्चा नाही. तसंच या सरकारविषयी नाराजी आहे.’’ असंशरद पवारम्हणाले. शरद पवारांना राम मंदिराचा मुद्दा महत्त्वाचा ठरेल का? हा प्रश्न विचारला होता. त्यावर त्यांनी हे उत्तर दिलं आहे.

**आणखी काय म्हणाले शरद पवार?**

‘‘कांद्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यंदा देशात साखरेचं उत्पादनही महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर झालं. निर्यातीचा प्रश्न उर्वरीत पान ३ वर

# नाशिक लोकसभा निवडणूकीतून माघार घेतोय !

## छगन भुजबळ यांची मोठी घोषणा

नाशिक : प्रतिनिधी

**लोकसभा मतदारसंघ महायुतीमधील कोणत्या पक्षाला मिळणार? याचा तिढा गेल्या अनेक दिवसांपासून होता. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांनी नाशिकवर आपला दावा ठोकला होता. मात्र निवडणूक जवळ येत असूनही तिढा सुटत नाही हे पाहून छगन भुजबळ यांनी स्वतःहून आपण माघार घेत असल्याचे आज जाहीर केले.**



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी आज पत्रकार परिषद घेऊन मागच्या तीन आठवड्यातील सर्व घटनाक्रम कथन केला. तसेच एका मतदारसंघामुळे महायुतीमध्ये तणाव निर्माण होऊ नये, तसेच प्रचारात विरोधकांना आघाडी मिळू नये, यासाठी मी हा निर्णय घेत आहे, असेही त्यांनी जाहीर केले. हे सांगत असताना छगन भुजबळ काहीसे भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. नाशिक लोकसभेसाठी नाव सुचविले त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचेही भुजबळ यांनी आभार मानले.

**काय म्हणाले छगन भुजबळ?**

उमेदवारीचा तिढा कधीपासून सुरू झाला, हे सांगताना भुजबळ यांनी होळीच्या दिवशी काय घडलं, याची माहिती दिली. ते म्हणाले, ‘‘होळीच्या दिवशी उपमुख्यमंत्रीअजित पवारयांनी मला देवगिरी बंगल्यावर बोलावून घेतलं होतं. त्यावेळी खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेदेखील तिथे उपस्थित होते. त्यांनी मला दिल्लीत केंद्रीय गृहमंत्रीअमित शाहयांच्याबरोबर बैठक झाली असल्याचे सांगितले. तसेच या बैठकीत नाशिकचा मतदारसंघ आपल्याला मिळाला असून तुम्ही याठिकाणी उमेदवारीची तयारी करा, असे आदेशच अजित पवार यांनी मला दिले.’’

मात्र याठिकाणी समीर भुजबळ हे योग्य उमेदवार आहेत, असेही मी अजित पवारांना सांगितल्याचे छगन भुजबळ म्हणाले. समीर भुजबळ यांचा पर्याय आपण अमित शाह यांच्यासमोर ठेवला होता. मात्र अमित शाह यांनी तुम्हीच (छगन भुजबळ) याठिकाणाहून लढावे, असा सल्ला दिल्याचा निरोप अजित पवारांनी मला दिला. तसेच अमित शाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सल्ल्यानेच तुमचे उर्वरीत पान ३ वर

# पुण्यात कोयता गँगनंतर गनगँगने डोके वर काढले

## गोळीबारांच्या घटनांनी शहर हादरले



येरवडा : प्रतिनिधी

**येरवड्यात हॉटेल चालकाने पैसे देण्यास नकार दिल्याने सात जणांच्या टोळक्याने तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून दोन गोळ्या झाडल्या. एक गोळी तरुणाच्या कमरेत लागली, त्यानंतर एकाने जखमी तरुणाच्या डोक्यात आणि पाठीवर कोयत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. अग्रसेन शाळेजवळ शुक्रवारी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला.**

येरवडा पोलिसांनी सहा आरोपींना ताब्यात घेतले आहे. जंगली महाराज रस्ता, शेवाळेवाडी आणि नऱ्हे पाठोपाठ सलग चौथ्या दिवशी गोळीबाराच्या घटनांनी शहर हादरून गेले आहे. किरकोळ कारणावरुन हल्ले करणाऱ्या कोयता गँग नंतर आता गन गँग डोके वर काढत आहे. त्यामुळे शिक्षणाचं माहेर घर पुणे असुरक्षित बनू लागले आहे.

विकी राजू चंडालीया (वय.२८, रा.जय जवान नगर,येरवडा) असे गोळीबारात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी भाऊ राहुल चंडालीया याने फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी उर्वरीत पान ३ वर

# बाप रे बाप... मतदान केंद्रात साप !

## उपस्थित कर्मचारी व नागरिकांचा गोंधळ

नागपूर :प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान आज देशासह महाराष्ट्रातील लोकसभेच्या पाच जागांचाही समावेश आहे. भंडारा-गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर, नागपूर, रामटेक लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. मात्र मतदानादरम्यान नागपूरच्या केडीके कॉलेज मतदान केंद्रातएक धक्कादायक घटना घडत असल्याचे समोर आले आहे. या मतदान केंद्रात साप आढळल्याने तिथे उपस्थित कर्मचारी आणि नागरिकांचा गोंधळ उडाला.**



मिळालेल्या माहितीनुसार दक्षिण नागपुरातील केडीके कॉलेज मतदान केंद्रात मतदान सुरू असताना सकाळी १० वाजता विषारी साप आढळून आला. या घटनेमुळे काही काळ मतदानासाठी आलेल्या मतदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. एका मतदान केंद्रातून विषारी साप बाहेर आल्याची घटना समोर आल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.

दरम्यान, मतदानासाठी आलेल्या मोहनीश मोहाडीकर या तरुणाने वाईल्डलाईफ वेल्फेअर सोसायटीचे नितीश भांडाकर यांना ही माहिती दिली. माहिती मिळताच नितीश भांदककर, रूपचंद वैद, लकी खलोडे यांनी घटनास्थळ गाठून सापाला वाचवले. सापाला पकडून जंगलात सोडण्यात आले. यामुळे अनुचित घटना घडली नाही.

**ईव्हीएम बिगाडीमुळे मतदानाला १ तास उशीर**

दिघोरी ते जयमाता प्रा. शाळेतील मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाल्याने. सुमारे १ तास १० मिनिटे उशिराने मतदान सुरू झाले असून मतदार मतदान केंद्राबाहेर ताटकळत रांगेत उभे होते. यावेळी मतदान केंद्रावर मोठी गर्दी होती. याप्रकरणी नगरसेवक पिंटू झलके यांनी आक्षेप घेतल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.माहितीनुसार, ईव्हीएममध्ये बिघाड झाल्यामुळे संपूर्ण युनिट घोषित करण्यात आले. जयमाता प्रा. बूथ क्रमांक २४६ शाळा मतदान केंद्राचे ईव्हीएम मशीन बदलण्यात आले आहे. आज पहिल्याच दिवशी अशी समस्या निर्माण झाल्याने पुन्हा एकदा नागरिकांच्या मनात ईव्हीएम मशीनबाबत शंका उपस्थित होत आहेत.


Sanskar Pratishthan’s

**DBM English Medium School** STATE BOARD

**DBM International School** CBSE PATTERN

**REQUIRED TEACHERS 2024-25**

We are looking for **Passionate experienced / Fresher, innovative and qualified teachers** with good communication skills and fluency in English for following Classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No. of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre- Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted | 5 |
| 2 | Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted / B.Ed. | 4 |
| 3 | Math’s | B.sc/ M.sc/ B.Ed. | 2 |
| 4 | Science | B.sc/ M.Sc. B.Ed. | 2 |
| 5 | STT | B.A./M.A. B.Ed / ( His/ Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 7 | Marathi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 8 | Hindi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Computer Knowledge | 1 |

**Walk – in Interview with all original documents On Thursday 25 April 2024, 10.00 AM to 3.00 PM at Above Address**

Note: *Salary commensurate based on Skill, qualification and Experience.
* Bus Facility will be provided.
* Training will be provided to fresher candidate who are passionate about Education.

**A/P-Ralegan Siddhi,Tal.Parner,Dist.Ahmednagar**
**P.H. 7666120168,9422755191,7083758198**

फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

# एपिलेटर वापरताना...

**शरीरावरील अनावश्यक केस काढून टाकण्यासाठी अनेक उपाय केले जातात. ट्विझिंग, प्लकिंग, वॅक्सिंग, शेव्हिंग, हेअर रिमूव्हिंग क्रीम वापरणे असे तात्पुरते उपाय आपण करतो. जर केस कायमचे काढून टाकायचे असतील तर इलेक्ट्रोलिसीस किंवा लेझर हेअर रिमूव्हल केले जाते. तुम्हाला जर सारखे सारखे वॅक्सिंग करायचे नसेल आणि रेझरने शेविंग करायचे नसेल किंवा केमिकल्सयुक्त हेअर रिमूव्हिंग क्रीम वापरायचे नसेल तर कदाचित एपिलेटर वापरणे हा तुमच्यासाठी योग्य पर्याय असू शकतो. हे विद्युत उपकरण थेट मुळांपासून केस काढण्यासाठी डिझाइन केलेले आहे. एपिलेटरचे दोन प्रकार असतात. एक म्हणजे ड्राय एपिलेटर, जे पाण्याशिवाय वापरले जाऊ शकते आणि दुसरे वेट एपिलेटर ज्यामध्ये स्नान करतानाच केस काढण्याची सोय असते...**

## एपिलेटर कसे काम करते...

एपिलेटर हे वॅक्सिंगसारखेच काम करते. ते देखील वॅक्सिंग प्रमाणेच केस मुळांपासून काढून टाकते. परंतु एपिलेटर वापरताना वॅक्स वापरायची गरज नसते. त्याऐवजी, शरीराच्या वेगवेगळ्या भागांवर एपिलेटर फिरवले की केस मुळापासून काढून टाकले जातात. तुम्हाला जर एपिलेटरचा जास्त चांगला परिणाम हवा असेल तर सर्वोत्तम एपिलेटर वापरण्यापूर्वी तुमची त्वचा स्क्रबने एक्सफोलिएट करा. एक्सफोलिएशनमुळे त्वचेच्या मृतपेशी निघून जातात आणि त्वचेमध्ये केसांची इनग्रोथ देखील होण्यास प्रतिबंध होतो.



## एपिलेटरचे फायदे...

केस मुळापासून निघताना वेदना होणे हीच काय एपिलेटरची एक कमतरता आहे. परंतु जर तुम्हाला ही वेदना सहन होत असेल तर एपिलेटर वापरण्याचे खूप फायदे आहेत. एपिलेटर वापरण्याचा एक फायदा असा आहे की शेव्हिंग, डिपिलेटरी क्रीम किंवा ट्विझिंगपेक्षा एपिलेटरमुळे त्वचा दीर्घकाळ हेअर- फ्री राहील. कारण केस मुळापासून काढल्यावर पुन्हा वाढण्यास जास्त वेळ लागतो. जर तुम्हाला खूप लहान केस काढायचे असतील तर एपिलेशन हा एक चांगला पर्याय असू शकतो. कारण कमी ग्रोथ असताना वॅक्सिंगचा फारसा उपयोग होत नाही. हात, पाय, खासगी अवयव आणि अगदी चेहऱ्यावरही तुम्ही एपिलेटरचा वापर करू शकता. याप्रकारे तुम्ही घरच्या घरीच वॅक्सिंग केल्यासारखी नितळ त्वचा मिळवू शकता.

## एपिलेटर कसे वापरायचे...

एपिलेटरला तुमच्या त्वचेच्या ९०-अंश कोनात ठेवा आणि हळू हळू त्वचेवर फिरवा. तुमच्या त्वचेवर डिव्हाइस दाबू नका. त्याऐवजी, ते त्वचेवर सैलपणे धरा. तुमची त्वचा खेचून घ्या आणि नंतर केसांच्या वाढीच्या दिशेने हळूहळू एपिलेटर फिरवा. जर तुम्ही केसांच्या वाढीच्या विरुद्ध दिशेने एपिलेटर फिरवले तर तुमच्या त्वचेवरील केस मुळापासून निघणार नाहीत, ते अर्धवट तुटतील. तुम्हाला जर एपिलेटर वापरायचा असेल तर तो रात्री वापरा. कारण केस काढून टाकल्यानंतर काहींना त्वचेवर लालसरपणा आणि जळजळ जाणवते. काही एपिलेटर्सचा स्पीड वेगळा असतो. तुम्हाला अंदाज येईपर्यंत आणि सवय होईपर्यंत सुरुवातीला स्पीडचे सेटिंग कमीच ठेवा आणि नंतर तुम्हाला कितपत सहन होतेय त्यानुसार हळूहळू वेग वाढवा. वॅक्सिंगसारखे एपिलेटर एका झटक्यातच मोठा पॅच काढत नाही, त्यामुळे तुम्हाला एपिलेटर वापरताना थोडा धीर धरावा लागेल. तुम्हाला तुमच्या त्वचेवर एपिलेटर हळूहळू फिरवावे लागेल. जर तुम्ही घाई करून एपिलेटर भराभर फिरवले तर तुमचे सगळे अनावश्यक केस निघणार नाहीत. तुमची त्वचा जर सेन्सिटिव्ह असेल तर एपिलेटर वापरल्यानंतर त्वचेचा दाह किंवा जळजळ होऊ नये म्हणून त्वचेला मॉइश्चरायझ करा. एपिलेटरमुळे त्वचेचा संसर्ग होऊ नये म्हणून प्रत्येक वापरानंतर एपिलेटर साफ करण्यास विसरू नका. तुम्ही एपिलेटर डिव्हाइस स्वच्छ करण्यासाठी अल्कोहोलचा वापर करू शकता. काही लोकांना केस मुळापासून काढणे हे वेदनादायक वाटू शकते. तसेच काहींना पहिल्यांदाच एपिलेशन करताना काही प्रमाणात अस्वस्थता जाणवते. तुमच्या शरीराच्या काही भागांची त्वचा इतरांपेक्षा जास्त संवेदनशील असू शकते. त्यामुळे हात व पायांपेक्षा अंडर आर्म्सवर एपिलेशन करताना काहींना जास्त वेदना जाणवू शकते.

# उन्हाळ्यात स्त्रियांना अधिक गरम का होते?



**तुमच्या घरात किंवा कार्यालयात सोबतच्या स्त्रिया, किती उकडतंय, किती गरम होतंय, पंख्याचा वारा लागतच नाही, एसी लावा, एसीचे तापमान कमी करा... वगैरे तक्रारी करत असतील तर त्यामागे तथ्य आहे, स्त्रिया उगाच तसं बोलत नसतात. सभोवतालच्या उष्ण तापमानाचा आरोग्यावर होणारा बरा-वाईट परिणाम अभ्यासताना असे दिसून येते की, पुरुषांच्या तुलनेत स्त्री-शरीरावर उष्ण तापमान अधिक विपरीत परिणाम करते. स्त्रियांवर उच्च तापमानाचा अधिक वाईट परिणाम का होतो.**

पुरुष आणि स्त्रियांच्या पेहरावामध्ये, कपड्यांमध्ये असणारा फरक हे स्त्रियांच्या शरीरावर उष्णतेचा अधिक परिणाम होण्याचे मुख्य कारण असल्याचे संशोधकांच्या लक्षात आले. त्यातही भारतासारख्या ज्या देशांमध्ये स्त्री-शरीर अधिकाधिक झाकले जाईल असे कपडे घालण्याचा रिवाज आहे, तिथल्या स्त्रियांनी एकावर एक घातलेले अंगावरचे कपडे, (त्यात पुन्हा आधुनिक काळात हवेचे अजिबात आवागमन (व्हेंटिलेशन) होऊ न देणारी जीन्स) आणि त्याखालील अंतर्वस्त्रे यामुळे शरीराला वारा लागत नाही आणि आतली उष्णता आतल्या आतच वाढत जाते. संपूर्ण शरीर झाकलेल्या कपड्यांमुळे बाह्य त्वचेला घाम निर्माण करून शरीराला थंड करण्याचा उपायसुद्धा करता येत नाही (जीन्समुळे तर अधिकच) त्यात पुन्हा स्वयंपाकघरात उष्णतेजवळ सरासरी दोन ते चार तास काम केल्यामुळे वाढणाऱ्या उष्म्यामुळे स्त्रियांचे शरीर अधिकच उष्ण होत जाते, जे विविध उष्णताजन्य विकारांना बळी पडू शकते.

उन्हाळ्यात स्त्रियांना अधिक गरम का होते, यामागे शास्त्रीय कारणसुद्धा आहे. शास्त्रीय कारणाचा विचार करता स्त्रियांच्या शरीरामध्ये त्वचेखाली असणारी अधिकची चरबी त्याला जबाबदार असल्याचे लक्षात येते. त्वचेखाली अधिक मात्रेमध्ये असणाऱ्या चरबीमुळे स्त्री-शरीराला सौष्ठव व सौंदर्य प्राप्त होते. हीच चरबी स्त्रियांच्या शरीराला अधिक ऊब देते. ऊब देण्याचा चरबीचा हा गुण हिवाळ्यात उपकारक सिद्ध होत असला तरी उन्हाळ्यात मात्र शरीराला सहजी थंड होऊ देत नाही व स्त्री-शरीर उन्हाळ्यामध्ये तुलनेने अधिक गरम राहते. एकंदरच उन्हाळ्याचा आणि उष्ण तापमानाचा स्त्रियांच्या आरोग्यावर किती विपरीत परिणाम होत असेल, याची पुरुषांना कल्पनासुद्धा करता येणार नाही. मात्र त्याची कल्पना करून, त्यामागील कारणे ओळखून त्यामध्ये बदल व्हायला हवा. संस्कृतीला धक्का न लावता स्त्रियांना हवेशीर कपडे कसे मिळतील याची काळजी घ्यायला हवी. स्वयंपाकघरातली उष्णता कशी वाहून जाईल व स्वयंपाकघर कसे हवेशीर राहील यासाठी प्रयत्न व्हायला हवे. महत्त्वाचे म्हणजे, स्वयंपाकाची जबाबदारी घरातल्या प्रत्येक सदस्याने उचलायला हवी. घरातल्या सर्वांच्या उदरभरणासाठी अन्न तयार करणे, ही काही एकट्या स्त्रीची जबाबदारी नाही. स्त्रियांनीसुद्धा पाणी व अन्य द्रवपदार्थ (चहा, कॉफी, मद्य वगळून) पित राहावे. केवळ दहा-बारा ग्लास पाणी पिऊन चालत नाही, शरीरातून घटलेले क्षार व ऊर्जा मिळायला हवी. त्यासाठी दिवसातून निदान एका शहाळ्याचे पाणी प्यावे. पाणी व थंडावा देणाऱ्या फळांचे सेवन करावे, जसे केळी, कलिंगड, काकडी, टरबूज, द्राक्ष, पेरू, वगैरे. दिवसातून एकदा तरी फळांचा रस प्यावा.

# कडक उन्हामुळे त्वचा काळी पडली?

**उन्हाळा म्हणजे घामाच्या धारा आणि असह्य उकाडा. कडक उन्हात फिरल्यामुळे आरोग्य समस्या तर होतातच पण त्वचेच्या समस्याही निर्माण होतात. उन्हाळ्यात त्वचेची काळजी घेऊनही बऱ्याचदा सनबर्न, सनटॅन, उष्णतेमुळे त्वचा कोरडी होऊन फुटणे अशा समस्या डोकं वर काढतात. जर या गंभीर परिणामांपासून त्वचेचं संरक्षण करायचं असेल तर काही घरगुती उपाय नक्कीच करायला हवेत...**

- घरातून बाहेर पडण्यापूर्वी हे कराच : उन्हाळ्यात त्वचेचं संरक्षण करण्याचा उत्तम उपाय म्हणजे घरातून बाहेर पडण्यापूर्वी त्वचेवर सनस्क्रिन लावणं. त्यासोबत सुती आणि संपूर्ण अंग झाकतील असे आरामदायक कपडे वापरा. ज्यामुळे तुमच्या अंगातून निघणारा घाम सुती कपडे शोषून घेतील आणि तुम्हाला फार गरम होणार नाही. टोपी, गॉगल, चांगले फूटवेअर, स्कार्फ, छत्री वापरून तुम्ही तुमच्या त्वचेची निगा राखू शकता. यासोबतच काही घरगुती उपाय करायला विसरू नका.
- काकडीचा रस : उन्हाळ्यात हायड्रेट राहण्यासाठी तुमच्या आहारात काकडी असणं गरजेचं आहे. मात्र या काकडीचा रस तुम्ही तुमच्या त्वचेवर लावून त्वचेवर झालेले सनटॅनचे डाग देखील कमी करू शकता. काकडीच्या रसामुळे त्वचा स्वच्छ होते आणि काळसरपणा कमी होतो. यासाठी काकडी किसून तिचा रस काढा आणि त्यात गुलाबपाणी मिसळून कापसाच्या मदतीने त्वचेवर लावा.
- लिंबाचा रस : लिंबाच्या रसात क्लिंझिंग घटक असल्याने या रसामुळे तुमची त्वचा मुळापासून स्वच्छ होते. लिंबाच्या रसामध्ये व्हिटॅमिन सी असतं जे त्वचेसाठी उत्तम ठरतं. अँटि ऑक्सिडंट असल्यामुळे तुमच्या त्वचेच्या समस्या कमी होतात. उन्हामुळे त्वचेवर निर्माण झालेला काळसरपणा कमी करण्यासाठी हा चांगला पर्याय आहे. यासाठी लिंबाच्या रसात थोडं मध आणि गुलाबपाणी मिसळा आणि त्वचेवर लावा. पंधरा मिनिटांनी त्वचा स्वच्छ करा.
- बटाट्याचा रस : बटाट्यामध्येही त्वचा मुळापासून स्वच्छ करणारे गुणधर्म असतात. त्वचेचं टेक्स्चर सुधारण्यासाठी आणि त्वचेला उजळपणा येण्यासाठी तुम्ही बटाट्याचा रस त्वचेवर लावू शकता. उन्हामुळे रापलेले हात, पाय आणि चेहरा यामुळे नक्कीच उजळून निघतो. बटाट्याच्या रसामध्ये थोडं गुलाबजल मिसळून त्वचेवर लावा आणि पंधरा मिनिटांनी चेहरा पाण्याने स्वच्छ करा.

# उन्हाळ्यात त्वचा चिकट होतेय?

**ऋतू बदलतो त्यानुसार त्वचेला काळजीची गरज असते. उदाहरणार्थ उन्हाळ्याच्या दिवसांत चेहऱ्यावर अधिक घाम येतो आणि त्यामुळे अनेकांच्या चेहऱ्यावरल तेलही अधिक प्रमाणात येते. त्यामुळे चेहरा केवळ चिकटच होतो असे नाही तर चेहरा डिहायड्रेट होण्याची शक्यताही खूपच वाढते. त्यामुळे तुम्ही उन्हाळ्याच्या दिवसात चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल काढण्यासह चेहऱ्याला योग्य हायड्रेशन देणेही गरजेचे आहे. आम्ही तुम्हाला उन्हाळ्यात जर त्वचा चिकट होत असेल तर ती हायड्रेट राखण्यासाठी नक्की काय करावं लागतं यासाठी काही सोप्या टिप्स देत आहोत. त्यासाठी तुम्ही काही गोष्टींचे नियमित पालन करणे गरजेचे आहे...**



## पाण्याचे योग्य प्रमाणात सेवन करा

सर्वात पहिले पाऊल म्हणजे आपली त्वचा अधिक चांगली राखण्यासाठी तुम्हाला उन्हाळ्याच्या दिवसातच नाही तर कायमस्वरूपी पाण्याचे योग्य सेवन करायला हवे. उन्हाळ्यात असंही शरीराला अधिक पाण्याची गरज भासते आणि त्यामुळे पाणी अधिक पिण्याचा सल्लाही दिला जातो. पण चमकदार आणि हायड्रेटेड त्वचा दिसण्यासाठी अधिक पाणी प्यायला हवे. उन्हाळ्याच्या दिवसात शरीरातून अधिक घाम येतो आणि याद्वारे पाणी निघून जाते, ज्यामुळे त्वचा अधिक हायड्रेट होते आणि तुमच्या त्वचेमध्ये जळजळ, अ‍ॅक्ने आणि लालिमा अशा अनेक समस्या होतात. त्यामुळे दिवसातून तुम्ही कमीत कमी 2-3 लीटर पाणी उन्हाळ्याच्या दिवसात प्यायला हवे. यामुळे चेहऱ्यावर येणारा तेलकटपणा आणि चिकटपणा कमी होण्यास मदत मिळते.


## हयालुरोनिक ॲसिडचा करा वापर

तुम्हाला पाण्याचा लाभ आपल्या त्वचेला व्हायला हवा असेल आणि अगदी त्वचेच्या आतमध्ये तुम्हाला याचा फायदा व्हायला हवा असेल तर हयालुरोनिक ॲसिडचा वापर तुम्ही करायला हवा. हे तुमच्या त्वचेमध्ये आतपर्यंत जाऊन मॉईश्चर राखण्यास मदत करते आणि संपूर्ण दिवस त्वचा हायड्रेट राखण्यास मदत मिळते. तुमच्या त्वचेच्या खाली असणाऱ्या सेल्समध्ये वॉटर मॉल्युकल्सचा शोध लाऊन तुमची त्वचा अधिक हायड्रेट करण्यास याची मदत मिळते.

## जेल बेस्ड मॉईस्चराईजरचा करा वापर

उन्हाळ्याच्या दिवसात अधिक व्यक्ती या मॉईस्चराईजरचा वापर करत नाहीत. पण हे अत्यंत चुकीचे आहे. यामुळे त्वचा अतिरिक्त सीबमचे निर्माण करते आणि मग त्वचा अधिक तेलकट आणि चिकट दिसून येते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांतदेखील मॉईस्चराईजरचा वापर करायला हवा. वास्तविक उन्हाळ्याच्या दिवसात अत्यंत हलके, जेल मॉईस्चराईजर वापरा. हे जेल बेस्ड मॉईस्चराईजर चिकट नसते, नॉनस्टिकी असते. त्यामुळे तुमच्या त्वचेमध्ये हे व्यवस्थित समाविष्ट होते आणि त्वचा व्यवस्थित हायड्रेट होते. यामुळे त्वचा चिकट दिसत नाही.

## मॅट सनस्क्रिनचा वापर करा



उन्हाळ्याच्या दिवसात प्रत्येकाला सनस्क्रिनचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येतो. पण उन्हाळ्याच्या दिवसात मॅट फिनिश सनस्क्रिनचा वापर करावा. जेणेकरून तुमची त्वचा तेलकट दिसणार नाही. अशा पद्धतीच्या सनस्क्रिनमध्ये मॅट फिनिश लुक असून तुमची त्वचा अतिरिक्त तेल येण्यापासून दूर राहते. तसंच SPF हे UV किरणांशी लढण्यासाठी तुमची मदत करतात. उन्हाळ्यात कधीही सनस्क्रिन लावल्याशिवाय बाहेर पडू नका. अन्यथा तुमच्या त्वचेची अधिक हानी होते हे लक्षात ठेवा.

# बॉडी बटरचा उपयोग काय?



**जर तुम्ही नियमितपणे त्वचेची काळजी घेत असाल आणि प्रामाणिकपणे स्किनकेअर रुटीनचे पालन करत असाल तर बॉडी बटर हे प्रॉडक्ट तुम्हाला माहितीच असेल. बॉडी बटर हा मॉइश्चरायझरचाच एक प्रकार आहे जो आपल्या त्वचेला खोलवर हायड्रेट करतो. बॉडी बटर हे साधारणपणे कोकोआ बटर, शिया बटर आणि मँगो बटरपासून बनवलेले एक घट्टसर क्रीम असते. तुमच्या त्वचेला अधिक पोषण मिळावे व निस्तेज कोरड्या त्वचेला आराम देण्यासाठी बॉडी बटरमध्ये कधी इसेन्शियल ऑईल्स देखील मिसळली जातात.**

कोरड्या त्वचेसाठी आपण अनेक घरगुती उपाय करतो. पण बॉडी बटर कोरड्या आणि खरखरीत झालेल्या त्वचेला पुन्हा मऊ व निरोगी करण्यात मदत करते. नैसर्गिक घटकांपासून बनवलेले बॉडी बटर त्वचेमध्ये आर्द्रता लॉक करून त्वचा पुन्हा पूर्ववत मऊ बनवते. कोरडी त्वचा अकाली वृद्ध दिसू शकते. कोरड्या त्वचेवर सुरकुत्या फार लवकर येतात आणि त्यामुळे व्यक्ती अकाली वृद्ध दिसते. परंतु मॉइश्चरायझ्ड, निरोगी दिसणारी आणि चमकदार त्वचा आपले खरे वय लपवू शकते. म्हणूनच जर अकाली वृद्ध दिसायचे नसेल तर त्वचेची नियमितपणे काळजी घेणे आवश्यक असते. त्वचेची काळजी घेण्यात नैसर्गिक घटकांपासून बनवलेले ऑरगॅनिक बॉडी बटर तुमची मदत करू शकते. बॉडी बटरचा आणखी एक उत्तम गुण म्हणजे ते वापरण्यास सोपे आहेत आणि अनेक उद्देश पूर्ण करतात. तुम्ही पुढीलपैकी एखादे बॉडी बटर वापरू शकता. हे बॉडी बटर्स ऑरगॅनिक आहेत आणि तुमच्या त्वचेसाठी अगदी सुरक्षित आहेत. ऑरगॅनिक हार्वेस्टचे ऑरगॅनिक बॉडी बटर विथ हनी मिल्क या बॉडी बटरमध्ये मध आणि दुधाचे पौष्टिक घटक आहेत. हे रिच बॉडी बटर त्वचेला 8 ते 12 तास मॉइश्चरायझेशन देऊन कोरड्या त्वचेला पुन्हा मऊ बनवते आणि संरक्षित करते. हे बॉडी बटर त्वचेत लगेच शोषले जाते आणि त्वचा तेलकट देखील होत नाही. हे 100% ऑरगॅनिक आहे व पुरुष आणि स्त्रिया दोघांच्याही त्वचेसाठी वापरण्यास योग्य आहे आणि केवळ कोरड्या त्वचेसाठी नव्हे तर सर्वच प्रकारच्या त्वचेसाठी फायदेशीर आहे. रात्री झोपताना स्वच्छ आणि कोरड्या त्वचेवर पुरेशा प्रमाणात बॉडी बटर लावा. ते शोषले जाण्यासाठी 1 मिनिट हलक्या हाताने मसाज करा. यामध्ये शिया बटर, ग्लिसरीन, मँगो बटर, कोकोआ बटर, कोरफडीचा गर असे औषधी घटक आहेत.

## स्ट्रेच मार्क्स घालविण्यासाठी...

स्त्रियांना गरोदरपणानंतर त्वचेवर स्ट्रेच मार्क्स येतात. या स्ट्रेच मार्क्सना कधी कधी खाज देखील सुटते. अशावेळी या स्ट्रेच मार्क्सवर लावण्यासाठी सिरोनाचे स्ट्रेच मार्क्स बॉडी बटर फायदेशीर आहे. सिरोना स्ट्रेच मार्क्स बॉडी बटर हे नैसर्गिक घटकांनी युक्त प्रॉडक्ट स्ट्रेच मार्क्स कमी करण्यासाठी आणि टाळण्यासाठी उपयुक्त आहे. हे त्वचेला खोलवर आर्द्रता देते आणि त्वचेला येणारी खाज शांत करते व कोरड्या त्वचेला पुन्हा ओलावा देते. यामध्ये व्हिटॅमिन ए आहे जे स्ट्रेच मार्क्स घालवण्यासाठी



कोलेजनची पुनर्बांधणी करण्यास मदत करते. यात असलेल्या अवाकाडो ऑइलमध्ये व्हिटॅमिन ए, डी, ई व ओमेगा -3 फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात आहेत. जे खराब झालेली त्वचा रिपेअर करतात आणि मऊ करतात. याशिवाय यात कोकोआ बटर, शिया बटर आणि कोकोनट ऑइल देखील आहे, जे त्वचेच्या पृष्ठभागावर आर्द्रता टिकवून ठेवण्यासाठी संरक्षणात्मक थर तयार करतात. गरोदरपणात वाढणाऱ्या पोटामुळे त्वचा ताणली जाते. तसेच हॉर्मोनल बदलांमुळे त्वचेतील नैसर्गिक ओलावा कमी होतो ज्यामुळे त्वचा कोरडी पडते. त्वचेला खाज सुटते आणि स्ट्रेच मार्क्स येतात. द मॉम्स को. च्या नॅचरल बॉडी बटरमध्ये मॉइश्चरायझिंग तेलांसह कोकोआ आणि शिया बटरचे औषधी गुण आहेत, जे तुमच्या त्वचेची नैसर्गिक लवचिकता वाढवतात व तुमच्या ताणल्या गेलेल्या पोटाच्या त्वचेला, नितंबांना आणि स्तनांना आराम देतात. दिवसातून एकदा लावल्यास या बॉडी बटरमुळे त्वचेला 24 तास मॉइश्चरायझेशन मिळते.

## शॉर्ट न्यूज

### घरफोडीच्या गुन्ह्यातील दोघे आरोपी जेरबंद

■ **नेवासा :** मुकिंदपूर येथे झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील दोघा आरोपींना ते दागिने विक्री करण्याच्या उद्देशाने नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथे उभे असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले. दोघेही आरोपी गंगापूर तालुक्यातील आहेत. फिर्यादी मोहनीराज आनंदा जाधव हे पत्नीसह घर बंद करुन शेतात गेले होते. त्यांचे घराचा दरवाजा अज्ञात चोरट्यांनी तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटात ठेवलेले ६० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेलेबाबत नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### विखे पाच वर्षे मतदारसंघात फिरकलेच नाहीत

■ **श्रीगोंदा :** निवडणूक आल्यानंतर खा. सुजय विखे मागील पाच वर्षे पुन्हा मतदारसंघात फिरकलेच नाहीत. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना मी प्रत्येक गावात जाऊन समस्या जाणून घेतो. त्यामुळे माझ्या मतदारसंघात कोणत्या रस्त्याला खड्डा आहे, कुठे बंधाऱ्याची आवश्यकता आहे, याची माहिती माझ्या डोळयापुढे असते, अशी भूमिका महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी श्रीगोंदा येथील दौऱ्यात मांडली.

### महिला बचत गटाची बैठक संपन्न

■ **नगर :** महानगरपालिकेच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. मागील निवडणुकीमध्ये महापालिका हद्दीमध्ये ६०.२६ % मतदान झाले होते. आता १०० % मतदान करण्यासाठी विविध उपयोजना करण्यात येत असून आज महिला बचत गटाची बैठक संपन्न झाली असून सदस्यांमार्फत घरोघरी जाऊन नागरिकांमध्ये मतदान करण्यासाठी जनजागृती केली जाणार आहे. याचबरोबर शहरांमध्ये मतदान जनजागृती साठी संकल्प रथयात्रा सुरू करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी दिली.

### चोरी करणाऱ्या दोन महिलांना अटक

■ **राहुरी :** एक महिला बसमध्ये प्रवास करत असताना तीन महिलांनी धक्काबुक्की करून तिच्या पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने व रोख रक्कम चोरी केल्याची घटना राहुरी पोलिस ठाणे हद्दीत घडली होती. राहुरी पोलिस ठाण्यात लूटमारीचा गुन्हा दाखल केला होता. दरम्यान पोलिस पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे व गोपनीय बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहितीवरून सापळा लावून महिला आरोपी पूजा आकाश रोकडे व संगीता जीवन लोंढे, दोघी रा. श्रीरामपूर यांना शिताफिने ताब्यात घेऊन अटक केली. त्यांच्याकडून चोरीस गेलेली रोख रक्कम जप्त करण्यात आली.

### एकटी असल्याचा फायदा घेत केली छेडछाड

■ **भिंगार :** किराणा दुकानात एकटी असलेल्या युवतीची दोन तरूणांनी छेड काढल्याची घटना नगर तालुक्यातील एका गावात (दि. १७) सायंकाळी घडली. याप्रकरणी पीडित युवतीने गुरूवारी (दि.१८) भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून दोन तरूणांविरूध्द विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आसाराम पवार व योगेश पवार अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. नगर तालुक्यातील एका गावात राहणारी युवती सोमवारी सायंकाळी आठच्या सुमारास त्यांच्या किराणा दुकानात एकटी होती. त्यावेळी तेथे आसाराम पवार व योगेश पवार हे दोघे आले होते.

# प्रभू श्रीरामाचे चरित्र माणसासारखे ऐकणे म्हणजे श्री रामचरितमानस

**। ह.भ.प.समाधान महाराज शर्मा । आदर्श गाव हिवरे बाजार येथे प्रभू श्रीराम शीलांश स्थापने निमित्त श्रीराम कथेला सुरुवात**



**हिवरे बाजार : प्रतिनिधी**
**आयन म्हणजे घर आणि रामायण म्हणजे प्रभू श्रीरामाचा निवास आणि चौपाई म्हणजे आपण थकून भागून घरी आल्यावर ज्यावर आराम करतो ती तुलसीदासजींच्या या चौपायांवर प्रभू श्री रामचंद्र गोड आराम करतात. तुलसीदासांनी श्री राम चरित् मानस रचले. मानस हा शब्द गुजराती आहे आपण म्हणतो ना भला माणूस. म्हणजे प्रभू श्रीरामाचे चरित्र माणसासारखे ऐकणे म्हणजे श्री राम चरित् मानस होय असे प्रतिपादन हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांनी केले.**

नगर तालुक्यातील आदर्श गाव हिवरे बाजार येथे प्रभू श्री रामचंद्रांच्या श्रीरामचंद्रांच्या शीलांश स्थापनेनिमित्त हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांच्या श्रीराम कथेचा आयोजन करण्यात आलं आहे त्याच्या शुभारंभ प्रसंगी महाराज कथा निरूपणात बोलत होते या दिवशी शिवपार्वती विवाह अख्यान याद्वारे कथेला सुरुवात झाली.

ते पुढे म्हणाले की आपल्या देशात मानसरोवर आहे ज्याच्यामध्ये पाणी आहे आणि रामचरितमानसमध्ये तुलसीदासांची वाणी आहे मानस सरोवर शेजारी सगळे हंस जमा होतात इथे सगळे परमहंस जमा होतात. त्याला चार घाट आहेत यालाही चार घाट आहेत. रामचरितमानसचा पहिला घाट शंकर-पार्वती दुसरा भरद्वाजची याज्ञवलकजी तिसरा काकशुंड जी गरुडजी चौथा तुळशीदासजी शरणागती आणि पाचवा घाट हिवरे बाजारचे व्यासपीठ आणि ग्रामराज्यात रामराज्य. पद्मश्री पोपटराव पवार यांना दि.२२ जानेवारी २४ रोजी श्रीक्षेत्र अयोध्या येथे रामलाल स्थापने प्रसंगी विशेष निमंत्रित करण्यात आले होते. त्यांना त्या ठिकाणी राम ललाची मूर्ती ज्या पाषाणातून घडविण्यात आली त्यातील शिलांश भेट म्हणून मिळाला. त्याची स्थापना हिवरेबाजार येथील मंदिरामध्ये करण्यात येणार आहे त्यानिमित्त या गावात श्रीरामाच्या साक्षीने प्रथमच श्री राम कथेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रास्ताविक करताना पोपटराव पवार म्हणाले की गतजन्मीची नव्हे तर शतजन्माची पुण्याई म्हणून की काय प्रभू श्रीरामाचा शिलांश हिवरे बाजार मध्ये आला आहे. त्याच्या स्थापनेसाठी समाधान महाराज शर्मा येतात हे देखील परम भाग्य आहे आपल्या सुमधुर वाणीतून अतिशय आकर्षकपणे ते कथा सादर करतात मौलिक विचार मांडतात हिवरे बाजारचे हे भाग्य आहे जणू रामराज्य येथे साकारते आहे. असे ते म्हणाले

ग्रामराज्यात रामराज्य या संकल्पनेवर आधारित ही कथा होत असून समाधान महाराज शर्मा यांच्या अमृतवाणीतून पंचक्रोशीतील भाविक कथा श्रवणाचा आनंद घेत आहेत. दिनांक १६ ते २३ एप्रिल दरम्यान दररोज सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत समाधान महाराज कथा सांगणार आहेत. दीप प्रज्वलन करून कथेला प्रारंभ झाला. यावेळी आळंदी येथील पालखी सोहळ्याचे अध्यक्ष योगी निरंजन दास आळंदी देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी वीर साहेब ,प्रसिद्धी प्रमुख उमेश महाराज, हरिभक्त परायण अमित महाराज घाडगे यावेळी उपस्थित होते.

दिनांक १६ रोजी कथेचे पहिले पुष्प गुंतण्यात आले. हिवरे बाजार मधील बालकलाकारांनी शिवपार्वती विवाह सोहळ्याचा सजीव देखावा सादर केला. महाआरतीने पहिल्या पुष्पाची संघटना झाली यावेळी महाप्रसाद वाटण्यात आला. यावेळी या श्रीराम कथेसाठी विशेष देणगी देणाऱ्या मान्यवरांचा नामोल्लेख करून सन्मान करण्यात आला.

**वाचकांच्या लेखणीतून**

# मत कुणाला द्यावं ?

आपल्या मतदारसंघाकडे ढुंकूनही न पाहणारे राजकीय पुढारी गरज लागली की मत मागायला बरोबर येतात. हजारो आश्वासन देऊन जातात आणि निवडुन आल्यानंतर विसरुनही जातात. मग प्रश्न पडतो की मत दयायचं कुणाला ?




माझ्या मते,मत अशा माणसाला दयावं, ज्याला सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाणीव आहे. आपण ज्याला मत देणार आहे तो आपल्यासाठी किती वेळ उपलब्ध राहु शकतो, संकटाच्या वेळी आपल्यासाठी कोण धावुन आलयं, आपल्याला कोणी आधार दिलायं, यांसारख्या बऱ्याच गोष्टींचा विचार करायला हवा. आपणही कुठल्याही आमिषाला बळी न पडता विवेकाने मतदान करावे. कुणाला जर चांगली इंग्रजी बोलता येत असेल तर तो चांगला खासदार होऊ शकतो अस मुळीच नाही...! जर त्याला मराठी भाषाच चांगली समजत नसेल तर सामान्य लोकांचे प्रश्न व अडचणी त्याला कसं काय समजणार ? परिवर्तन जर हवे असेल जर नव्या चेहऱ्याला संधी द्यायलाच हवी.

**हर्षदा शाम मापारी**

(पान १ वरून)

## रामाच्या मंदिरात सीतेची मूर्ती का नाही?

आहे. शेतीमालल बाहेर गेला पाहिजे, शेतकऱ्यांच्या हातात दोन पैसे अधिकचे पडले पाहिजेत या गोष्टीला या सरकारचा विरोध आहे. शेतकऱ्यांना वर्षातून एकदा सहा हजार रुपये द्यायचे, पण खतांचे दर वाढतात, औषधं महाग झाली आहेत, मजुरी महाग झाली आहे याकडे कोण बघणार?'' असाही प्रश्न शरद पवारांनी उपस्थित केला.

## नाशिक लोकसभा निवडणूकीतून माघार घेतोय !

नाव सांगितले आहे, असेही अजित पवारांनी मला सांगितले.
नाशिकमध्ये सध्या शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार असून हा मतदारसंघ त्यांच्या वाट्यातला आहे, अशीही आठवण छगन भुजबळ यांनी करून दिली. मात्र आम्ही शिवसेनेची समजूत घालू, असा शब्द अमित शाह यांनी आम्हाला दिला असल्याचे अजित पवार मला म्हणाले, असेही छगन भुजबळ यांनी सांगितले.

मला तर विश्वास बसत नव्हता, पण

छगन भुजबळ पुढे म्हणाले की, मला तर विश्वासच बसत नव्हता. म्हणून मी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करून याबाबत विचारले. तर त्यांनीही अमित शाहांचा निरोप असून मला निवडणूक लढवावी लागेल, असे सांगितले. भाजपाचे प्रदेशाध्यक्षचंद्रशेखर बावनकुळेयांनाही विचारले तर त्यांनीही हेच सांगितले. तसेच माझे नाव पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सुचविले होते. त्यामुळे अमित शाह यांनी तुमच्या नावाचा आग्रह धरला, असेही बावनकुळे म्हणाले असल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

पण चर्चा लांबल्यामुळे मी माघार घेतो

''होळी होऊन आता तीन आठवडे झाले आहेत. उमेदवारी देणार हे स्पष्ट असताना पुन्हा एकदा चर्चा का सुरू झाल्या? हे कळायला मार्ग नाही. महाविकास आघाडीने त्यांचा उमेदवार जाहीर केला असून ते प्रचाराच्या कामाला लागले आहेत. त्यामुळे महायुतीने नाशिकबाबत ताबडतोब निर्णय घ्यायला हवा होता. तो निर्णय का होऊ शकला नाही? याबाबत आता मला भाष्य करायचे नाही. मी नाशिकची संदिग्धता कायमची दूर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळेच मी आज उमेदवारीतून माघार घेत आहे'', असे छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले.

## पुण्यात कोयता गँगनंतर गनगँगने डोके वर काढले

आकाश सतीश चंडालीया, अक्षय सतीश चंडालीया, अमन सतीश चंडालीया (रा. रेंजहिल्स,शिवाजी नगर), अभिषेक शाम चंडालीया, संदेश संतोष चंडालीया (रा. जय जवान नगर,येरवडा), सुशांत प्रकाश कांबळे (आंबेडकर सोसायटी) आणि संकेत तारू (रा.येरवडा) अशी आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवडा येथील अग्रसेन शाळेसमोर विकी चंडालीया याचे व्हीआर ४ यु नावाचे हॉटेल आहे. खुनाच्या गुन्ह्यात सहा महिन्यांपूर्वी येरवडा कारागृहातून आकाश चंडालीया जामिनावर बाहेर आला आहे. आठ दिवसांपूर्वी आकाश चंडालीया हा विकी याच्या हॉटेलमध्ये आला होता. तुला हॉटेल चालवायचे असेल तर पैसे द्यावे लागतील, नाही दिले तर बघून घेण्याची धमकी दिली होती. आरोपी आकाश चंडालीया हा लहानपणाचा मित्र असल्याने विकी याने पोलिसांत तक्रार दिली नव्हती.

शुक्रवारी पहाटे एक वाजण्याच्या सुमारास आकाश चंडालीया हा त्याच्या भाऊ आणि साथीदारांसोबत विकीच्या हॉटेलमध्ये शिरले. आकाशने विकीकडे पुन्हा पैशांची मागणी केली. विकी चंडालीया याने पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे आकाशने त्याच्या जवळील पिस्तूल काढून हवेत एक गोळीबार केला आणि दुसरी गोळी विकीवर झाडली. विकी याच्या पोटाच्या उजव्या बाजूला कमरेत गोळी शिरल्याने खाली पडला. त्यानतंर सोबत आलेल्या आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्याच्या डोक्यात आणि पाठीवर कोयत्याने वार करून निघून गेले.

चंडालीया कुटुंबातील वादामुळे गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची प्राथमिक माहिती पुढे येत आहे. गोळीबार झाल्याचे समजताच पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त विजयकुमार मगर, गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, सहाय्यक आयुक्त आरती बनसोडे यांनी धाव घेऊन तपासाच्या सूचना केल्या.









# पुण्याची बेपत्ता शाळकरी मुलगी रांजणगावमध्ये सापडली!

## ■ रांजणगाव देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांची शिष्टाई
## ■ मुलगी रात्री उशिरा आई- वडिलांच्या ताब्यात

शिरूर : सतीश डोंगरे

**पुण्याच्या नांदेड सिटी येथून शाळा सुटल्यानंतर बेपत्ता झालेली १२ वर्षांची शाळकरी मुलगी गुरुवारी रात्री ८:३० वाजता रांजणगाव गणपतीच्या मंदिरात सापडली. देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी तिच्या कुटुंबियांचा शोध घेत रात्री ११ वाजता मुलीला सुरक्षित तिच्या कुटुंबियांच्या स्वाधिन केले. मुलीला पाहताच आईच्या अश्रूंचा बांध फुटला. मुलीला कवटाळत तिने आपल्या भावनांना मोकळी वाट करून दिली.**

याबाबत सविस्तर माहीती अशी, पुण्याच्या विद्या प्रतिष्ठानच्या नांदेड सिटी पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिकणारी ओवी प्रदिप राक्षे ही शाळकरी मुलगी दुपारी शाळा सुटल्यानंतर अचानक बेपत्ता झाली. ही बातमी वाऱ्यासारखी पसरल्यानंतर या भागात प्रचंड खळबळ उडाली. शहर पोलीस प्रशासनानेही ही बाब गंभीरपणे घेत तातडीने तपास सुरु केला. त्यासाठी संबंधित भागातील सीसीटिव्हींची ही पडताळणी करण्यात येत होती. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी थेट राक्षे कुटुंबियांची भेट घेऊन माहिती घेत पोलीसांना तपासाबाबत योग्य त्या सूचना केल्या. पुणे शहरासह ग्रामीणच्या सर्व पोलीस ठाण्यांना याबाबत माहिती कळविण्यात आली.बेपत्ता मुलीच्या फोटोसह सोशल मीडियावर पोस्ट फिरु लागल्या. महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे अध्यक्ष जनसेवा शिवाभाऊ पासलकर यांनी ही बेपत्ता मुलीच्या शोधासाठी यंत्रणा लावली.



गुरुवारी रात्री साडे आठच्या सुमारास शिरुर तालुक्यातील रांजणगाव गणपती मंदिरातील पार्कीगमध्ये एक लहान मुलगी घाबरलेल्या अवस्थेत एकटीच बसल्याचे काही भाविकांच्या लक्षात आले. भाविकांनी ही बाब देवस्थानच्या सुरक्षा रक्षकांच्या नजरेस आणून दिली. त्यानंतर सुरक्षा रक्षकांनी देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांना कळविले. देवस्थानचे मुख्य विश्वस्त ओमकार देव तात्काळ त्याठिकाणी पोहचले. त्यानंतर मुलीला धीर देत त्यांनी विचारपूस केली मात्र घाबरल्या मुळे मुलीला काहीच सांगता येत नव्हते. तोपर्यंत सोशल मीडियावरील व्हायरल पोस्ट मुळे हीच ती बेपत्ता मुलगी असावी. या निष्कर्षापर्यंत सर्वजण आले. संबंधित पोस्ट वरील नंबरवर मोबाईलवर व्हिडीओ कॉलद्वारे संपर्क करण्यात आला. फोन थेट मुलीच्या आईनेच उचलला आणि ही आमचीच मुलगी असल्याचे सांगितले. आम्ही लगेच रांजणगांवला मुलीला घेण्यासाठी येत असल्याचे कळविले.

त्यानंतर रात्री ११ वाजता मुलीची आई नातेवाइकांसह रांजणगावला आली. मुलीला पाहताच तिने तिला कवटाळत आपल्या अश्रूंना मोकळी वाट करुन दिली. यावेळी उपस्थित सर्वांनाच गलबलून आले. त्यानंतर पोलीसांच्या उपस्थितीत मुलीला आईच्या ताब्यात देण्यात आले. महागणपतीच्या आशिर्वादाने आमची मुलगी सापडली असे म्हणत सर्वांनी गणपतीचे दर्शन घेतले आणि रात्री उशिरा मुलीला घेऊन तिचे नातेवाईक पुण्याच्या दिशेने रवाना झाले. मुलगी रांजणगाव पर्यंत कशी पोहचली याबाबतचे गूढ मात्र अद्यापही कायम आहे.

### गणपतीच्या आशिर्वादाने आमची मुलगी सुखरुप !

**शाळा सुटल्यानंतर मी दररोज मुलीला आणण्यासाठी शाळेत जाते. मात्र काल थोडा उशीर झाला. शाळेत पोहचल्यानंतर मुलगी बेपत्ता असल्याचे लक्षात आले. त्यानंतर मी अक्षरशः घाबरुन गेले. पोलीसांना कळविण्यात आले. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास रांजणगाव गणपती येथून फोन आला आणि आमचा जीव भांड्यात पडला. आम्ही रांजणगावला जाऊन मुलीला ताब्यात घेतले. गणपतीच्या आशिर्वादानेच आमची मुलगी सुरक्षित सापडली. मुलगी घाबरलेल्या अवस्थेत असल्यामुळे ती नेमकी रांजणगावला कशी पोहचली याबाबत तिला अद्यापही सांगता येत नाही.**

**कावेरी प्रदिप राक्षे, मुलीची आई, पुणे**

# टाकळी ढोकेश्वरला रविवारी मंत्री राधाकृष्ण विखेंचा प्रचार मेळावा

## सुजित झावरे पाटील यांची माहिती

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**सध्या लोकसभा निवडणुकांचे वारे जोरदार वाहू लागले आहे. नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात खासदार सुजय विखे व माजी आमदार निलेश लंके यांच्यात थेट लढत होणार आहे. सुजय विखे यांनी पारनेर-नगर विधानसभा मतदार संघात चांगलेच लक्ष घातले आहे. अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांची टाकळी ढोकेश्वर येथे खासदार सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ रविवार दि २१ रोजी जाहीर सभा होणार असल्याची माहिती जि.प. माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी दिली.**

नीलेश लंके यांना त्यांच्या होम ग्राउंड वर रोखण्यासाठी खासदार सुजय विखे यांनी चांगली रणनीती आखली आहे. त्यांनी पूर्णतः पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघांमध्ये लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात दोन्ही उमेदवारांकडून प्रचार शिगेला पोहोचला आहे.



टाकळी ढोकेश्वर व ढवळपुरी जिल्हा परिषद गटातील कार्यकर्त्यांचा मेळावा टाकळी ढोकेश्वर या ठिकाणी कटारिया मंगल कार्यालयात ठेवण्यात आला आहे. या मेळाव्याला नामदार राधाकृष्ण विखे पाटील हे उपस्थित राहणार आहेत.

खासदार सुजय विखे यांना नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून मोठ मताधिक्य देण्यासाठी पारनेर तालुक्याचे नेते सुजित झावरे पाटील यांनी कंबर कसली आहे. तालुक्यात जुळवा जुळवून त्यांनी सुरू केली असून सुजय विखे सर्वाधिक मताधिक्य घेतील असा दावा सुजित झावरे यांनी केला आहे.
टाकळी ढोकेश्वर येथे होणारा मेळावा हा सुजित झावरे पाटील मित्र मंडळ व देवकृपा फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याच्या आवाहन सूजित झावरे पाटील मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. खासदार सुजय विखे यांना पारनेर तालुक्यातून सर्वाधिक मताधिक्य देण्यासाठी सुजित झावरे पाटील हे सक्रिय झाले आहेत.

# कळसच्या शेतकऱ्याला वराळ जनसेवा फौंडेशनची मदत

## वादळी पावसाने झाला होता संसार उद्ध्वस्त

निघोज : प्रतिनिधी

**गेली दोन दिवसांपूर्वी पारनेर तालुक्यातील कळस येथील शेतकरी प्रशांत गाडगे यांचे घर वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसाने उध्वस्त होत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. गाडगे यांचा संसार उघड्यावर आला होता. त्याच वेळी त्या परिसरात संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ होते त्यांना ही माहिती समजताच गाडगे यांच्या घराला भेट देऊन वराळ यांनी पाहाणी करीत गाडगे यांना मदत करण्याचे आश्वासन दिले.**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपाध्यक्ष महेंद्र गाडगे यांच्या विशेष प्रयत्नातून बुधवारी,दि. १७ रोजी वराळ पाटील यांनी गाडगे यांना ४० हजार रुपयांचे पत्रे तसेच इतर साहित्य देऊन उध्वस्त झालेल्या घराची डागडुजी केली आहे.



**संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी प्रत्यक्ष परिस्थिती पाहून मला व आमच्या कुटुंबाला मोठा आधार दिला माझे घर वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसाने उध्वस्त झाले होते. वराळ पाटील हे देवाप्रमाणे धावून आले कोणत्या शब्दात त्यांचे आभार मानावे हेच समजत नाही.**

**प्रशांत गाडगे, शेतकरी**

# निघोजला श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

## प्रभू रामांच्या मुर्तीची वाजत गाजत मिरवणूक

निघोज : प्रतिनिधी

**प्रभू श्रीराम जन्मोत्सव निघोज व परिसरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दुपारी पाच वाजता प्रभू रामचंद्र यांच्या भव्य मुर्तीची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी जय श्रीराम घोषणांनी परिसर निनादून गेला होता. ग्रामपंचायत चौक, ते नवी पेठ तसेच एस टी बस स्थानक परिसर ते मळगंगा मंदिर अशी सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती.**



या मिरवणुकीत युवक वर्ग तसेच महिला भगीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी मिरवणुकीतील युवकांनी भगव्या टोप्या घातल्या होत्या. जय श्रीराम जयघोष सवाद्य मिरवणूक तसेच आकर्षक फटाक्यांची आतषबाजी करीत मिरवणूकीला शोभा आली होती. यावेळी मोठ्या प्रमाणात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. निघोज ग्रामस्थ,जय श्रीराम समीती यांनी या मिरवणुकीचे आयोजन केले होते. तब्बल चार तास ही मिरवणूक सुरू होती. हजारोंचा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.श्रीराम मंदिराजवळ मिरवणूक आल्यानंतर प्रभू श्रीराम यांची महाआरती करण्यात आली.

# मंथन स्पर्धा परीक्षेत गुरुदेवचे ४० विद्यार्थी गुणवत्ता यादीत

## केंद्र स्तरीय गुणवत्ता यादीतही ३५ विद्यार्थी झळकले

सुपा : प्रतिनिधी

**सुपा शहरामध्ये अल्पावधीतच स्वतःची स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या पारनेर तालुक्यातील सुपा येथील गुरुदेव सेमी इंग्लिश स्कूल या शाळेचे तब्बल ४० विद्यार्थी राज्य, जिल्हा व केंद्रातील गुणवत्ता यादीत झळकले आहेत.त्यामुळे शाळेचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.**

सध्याच्या स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षांना खूप महत्त्व प्राप्त झाले आहे, ही गरज ओळखून शाळा मंथन, लक्षवेध ,आय एम विनर, ओलंपियाड शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा अशा विविध स्पर्धा परीक्षांना मुले बसवत असते.




यामध्ये मंथन परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. शाळेचे राज्य यादीत एक, जिल्हा गुणवत्ता यादीत चार व केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत ३५ विद्यार्थी झळकले आहेत.
एकच ध्यास.... गुणवत्ता विकासया उपक्रमांतर्गत शाळा शिस्त, संस्कार यांबरोबरच गुणवत्तेला महत्त्व देते. या निकालामुळे शाळेची जिल्ह्यात वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

या यशामुळे मुलांचे संस्थेच्या सर्वेसर्वा, विस्तार अधिकारी शोभा शिर्के मॅडम, संस्थापक सुभाष मगर,संचालक मधुकर शिर्के, शंकर दोरगे, त्रिंबक दुधाडे, मोहन तांबे यांनी अभिनंदन केले आहे. या यशाबद्दल बोलताना संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर म्हणाले की, सामान्यांच्या स्वप्नांना पंख देणारी शाळा अशी गुरुदेव प्रशालेची ओळख निर्माण झाली आहे. भविष्यात हेच आमचे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकारी बनतील.

यशस्वी विद्यार्थी व त्यांचे गुण भूमी संदीप शेळके, इयत्ता २ री १४४ / १५० राज्यात- चौथी, आरव सचिन शिंदे इयत्ता १ ली १३६ / १५० राज्यात आठवा. श्लोक संदीप भालेकर, इयत्ता २ री १३६/ १५० राज्यात आठवा, सानवी किशोर मांडगेइयत्ता ३ री २८६ / ३०० राज्यात आठवी. मोहम्मद अली काजी इयत्ता २ री १३४ / १५० राज्यात नववा यांबरोबरच केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत देखील ३५ विद्यार्थी झळकले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना प्रियंका ढुबे, मनीषा रासकर व अर्चना रेपाळे यांनी मार्गदर्शन केले.

# मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत आपधूप शाळेचे यश

## सुशील गवळीचा केंद्रात दुसरा क्रमांक

सुपा : प्रतिनिधी

**राज्यस्तरीय मंथन परीक्षा २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रा.शाळा आपधूप शाळेची इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी स्वरा सुशील गवळी हिने केंद्रात दुसरा क्रमांक व जिल्ह्यात १५ वा तर इयत्ता दुसरीची विद्यार्थीनी कार्तिकी तानाजी गवळी हिने जिल्ह्यात सहावा केंद्रात पहिला क्रमांक पटकविला.**

ईश्वरी जिजाबापू गवळी हिने जिल्ह्यात चौदावा केंद्रात तिसरा इयत्ता तिसरीचा साई गणेश गवळी यांने जिल्ह्यात ३३ वा केंद्रात पहिला क्रमांक मिळवला तसेच अंकिता बाळू गवळी हिने केंद्रात तिसरा क्रमांक आदेश सचिन गवळी यांनी केंद्रात पाचवा क्रमांक पटकावला.मागील वर्षाच्या मंथन परीक्षेमध्ये सुद्धा या विद्यार्थ्यांनी राज्य जिल्ह्यात गुणवत्ता यादीत यश संपादन केले होते.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका रतनबाई आढाव,आदर्श शिक्षक सचिन परांडे यांचे मार्गदर्शन लाभले. गुणवत्ता यादीत भरघोष यश संपादन केल्याबद्दल अपधूप गावच्या सरपंचताई मीनाक्षीताई नामदेवराव गवळी उपसरपंच शितल अनिल गवळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन रावसाहेब गवळी उपाध्यक्ष गणेश भाऊसाहेब गवळी उद्योजक सुरेशशेठ गवळी,गोकुळशेठ गवळी महाराज या सर्वांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच पारनेर तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सीमाताई राणे विस्ताराधिकारी ढवळे साहेब व सुपा केंद्राचे केंद्रप्रमुख भिवसेन पवार उपकेंद्रातील सर्व शिक्षक व गावातील सर्व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**केंद्रप्रमुख भिवसेन पवार जिल्हा परिषदेच्या शाळेचा दर्जा उत्कृष्ट झाला असल्याने पट संख्या देखील दिवसेंदिवस वाढत आहे.तसेच येथील शिक्षक सर्वगुण संपन्न असल्याने विद्यार्थी देखील सर्व कौशल्य प्राप्त करुन उज्वल भविष्याकडे वाटचाल करतील असे मत केंद्रप्रमुख भिवसेन पवार यांनी व्यक्त केले.**

# अळकुटी येथे श्रीराम नवमी उत्साहात साजरी

## अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न

अळकुटी : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील अळकुटी येथे श्रीराम मंदिर विश्वस्त मंडळ, समस्त ग्रामस्थ व मुंबईकर मंडळाच्या वतीने श्रीराम नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीराम जन्मोत्सवा निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता श्रीकृष्णकृपांकित डॉ. विकासजी महाराज मिसाळ यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. सायंकाळी प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेच्या मिरवणूकीत ग्रामस्थांनी व तरुणाईने उस्फुर्त सहभाग घेत श्रीरामांच्या जयघोषाने परिसर दुमदुमुन टाकला होता.**



आठ दिवस चाललेल्या अखंड हरिनाम सप्ताहात भजन, किर्तन, प्रवचन व राम नामाचा जप आदि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्रीरामनवमी निमित्त ह.भ.प. राजेंद्र महाराज कुहे यांचे श्रीराम जन्माचे किर्तन झाले. श्रीराम मुर्तीस गंगाजलाने जलाभिषेक करून श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला मंदिर व परिसरात पुष्पवृष्टी तसेच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यावेळी प्रभू श्रीरामाचा पाळणा व भजनाचे भाविकांनी सामुदायिक भजन गायन केले.

या सप्ताहात प्रवचनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज जमदाडे, वैजनाथ महाराज पडवळ, श्रीकांत महाराज कनिंगध्वज, राधाकृष्ण घुमरे, डॉ.आर.जी. सय्यद, सुमंत महाराज हंबीर यांचे प्रवचन तसेच किर्तनकार ह.भ.प. लक्ष्मण महाराज बेलकर, ज्ञानेश्वर महाराज रासकर, संभाजी महाराज दरोडे, सुनिल महाराज झांबरे, उज्वलाताई वाकळे, प्रेमानंद महाराज शास्त्री, निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे सुश्राव्य किर्तन झाले. ह.भ.प. बाळासाहेब चौधरी यांनी ज्ञानेश्वरी पारायण केले. सप्ताह काळात अळकुटी व परिसरातील अन्नदात्यांनी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते. तसेच मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com